**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.५९**

**साक्षीदार क्र. ८ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – नवनाथ चंद्रभान आसणे,

**वय** – ४० वर्षे, व्यवसाय –शेती,

**राहणार** – माळवडगांव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु**

१. दि.२१.०७.२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता माळवडगाव येथे घटनास्थळी बोलावले होते. सदर रोजी माझ्यासोबत दुसरा पंच रावसाहेब तुकाराम दळे हे देखील हजर होते. आम्हाला घटनेची माहिती तपासिक अंमलदार श्री.बर्डे यांनी सांगितली व त्यांनी घटनास्थळ देखील दाखवले. सदर ठिकाणी सुशिला दिलीप आसणे, जयश्री दिलीप आसणे व विकास दिलीप आसणे यांना रॉडने मारहाण झाली होती व उभ्या घासाचे पिकात ट्रॅक्टरने रोटार मारले होते. घटनास्थळाच्या पूर्वेस माझी चुलती सिंधुबाई जगननाथ यांची शेत जमिन, पश्चिमेला संदिप सुदाम आसणे यांची मिळकत उत्तरेस राजू भागाजी आसणे यांची शेत जमिन व दक्षिणेस खडकवाडी माळेवाडी रस्ता आहे. मला अभिलेखावरील घटनास्थळाचा फोटो दाखवला. सदर फोटोमध्ये मी, रावसाहेब तुकाराम दळे, संतोष सुदाम आसणे व बर्डे दादा आहेत. सदर फोटो हा माळवडगाव येथील गट नं.१०२ चा आहे. सदर जमिनीत घास पीक उभे होते. त्यामध्ये रोटार मारल्याचे दिसते. सदर फोटो यास **आर्टीकल ब** देण्यात आले. पोलीसांनी सदर घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष केला व त्यातील मजकूर मला वाचून दाखवला. त्यावर पंच क्र.२ म्हणूनची सही माझी आहे. ती मि ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.६०** देण्यात आले.

२. पोलीसांनी दि.२१.०७.२०२० रोजी माझा जबाब देखील नोंदवला होता. घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.०० ते ३.३० वाजाच्या दरम्यान माळवडगाव

गट नं.१०२/५ मध्ये घडली होती. त्यावेळी मी शेजारीच होतो. सदर रोजी सुशिला दिलीप आसणे यांच्या घासाचे उभ्या पीकात आरोपी स्वतःच्या मालकीचा ट्रॅक्टर आणून सागर भाऊसाहेब आसणे याने रोटार मारला. सुशिला दिलीप आसणे ह्या सदरवेळी ट्रॅक्टरच्या आडवे गेल्या असता, सागर भाऊसाहेब आसणे याने विकास दिलीप आसणे याच्या डोक्यात टॉमी मारुन जयश्री दिलीप आसणे यांना देखील हाणमार केली. विकास दिलीप आसणे याचा मोबाईल घेवून मोडतोड केली. विकास दिलीप आसणे याच्या डोक्याला पाठीमागे मार लागल्यामुळे मी स्वतः त्याला पोलीस स्टेशनला घेवून येवून साखर कामगार हॉस्पीटल येथे दाखल केले. सागर भाऊसाहेब आसणे, दादासाहेब पदमनाथ आसणे, जिजाबाई सोपान सुरासे, बाबासाहेब सोपान सुरासे, शोभा दादासाहेब आसणे व वनीता दादासाहेब आसणे यांनी मारहाण केली होती. सदर मारहाणीत विकास याचे डोक्याला मार लागला होता. ज्या गजाने विकास याला मारहाण झाली होती तो पाहिल्यास मी ओळूख शकतो. आर्टीकल अ वरील गज तोच आहे. आजरोजी मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी दादासाहेब आसणे व शोभा आसणे हे न्यायालयात हजर आहेत. इतर आरोपीतर्फे गैरहजेरीमाफीचा अर्ज देण्यात आला.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी.बी.औताडे यांचेमार्फत सुरु–</u>**

३. फिर्यादी सुशिलाबाई हया माझ्या भावजयी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचयामध्ये एकमेकांविरुद्ध भांडणाच्या फौजदारी प्रकरणे दाखल झालेले आहेत. पोलीसांची व माझी सदर घटनेसंदर्भात पहिल्यांदा दि.२१.०७.२०२० रोजी भेट झाली. मी दि.१८.०७.२०२० रोजी पोलीस स्टेशनला गेलो होतो. तसेच सुशिला दिलीप आसणे, विकास दिलीप आसणे, दिलीप सुदाम आसणे व मी असे पोलीस स्टेशनला सदर रोजी दुपारी ४.०० ते ४.३० वाजाच्या दरम्यान गेलो. आम्ही पोलीसांना घटनेबाबत सांगितले व त्यांनी लिहून घेतले होते. त्यांनी सुशिलाबाईची सही घेतली होती. आम्ही पंचनामा करण्याकरीता आरोपी व सुशिलाबाई यांचे ज्या शेतजमिनीवरुन भांडण आहे त्याच शेतजमिनीमध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर शेतजमिनीमध्ये सुशिलाबाई यांनी येवू नये म्हणून न्यायालयाचा मनाई हुकूम आहे.

**४.** मी पंचनाम्यावर सकाळी १०.०० वाजता सही केली. दि.१८.०७.२०२० रोजी मी पोलीस स्टेशला सही केली नाही. पोलीसांनी १८.०७.२०२० रोजी मी जे सांगितले होते ते लिहून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझे वाद असल्यामुळे मी घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष केल्याचे व घटना माझ्यासमक्ष घडल्याचे खोटे सांगत आहे.

**५.** मी पोलीसांना जबाब देतेवेळी विकासच्या डोक्याला पाठीमागे लागले होते हा मजकूर सांगितला होता. पोलीसांनी सदरचा मजकूर माझ्या जबाबात का लिहीला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, दिलीप आसणे यांच्या सांगण्यावरुन माझ्या सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्यासमक्ष फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/-

**(ए.एस.कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,

न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

दिनांक – ०८/१०/२०२५.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.५७**

**<u>साक्षीदार क्र. ७ चा शपथेवर जबाब.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – ज्ञानेश्वर रावसाहेब आसणे,

**वय** – ४४ वर्षे, व्यवसाय –शेती,

**राहणार** – माळवडगांव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु</u>**

**१.** दि.२८.०७.२०२० रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशनला बोलावले होते. सदर रोजी माझ्यासोबत दुसरा पंच नवनाथ चंद्रभान आसणे व रविंद्र नानासाहेब आसणे असे देखील हजर होते. त्यानंतर आम्ही पंचनामा करण्याकरीता घटनास्थळी गेलो. सदर ठिकाणी आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये शेतीच्या कारणावरुन वाद व मारामारी झाली होती. पोलीसांनी सदर ठिकाणी माझ्यासमक्ष घटनास्थळावरुन रॉड जप्त केला तो आरोपींनी दिला. तसेच पोलीसांनी निळया कलरचा ट्रॅक्टर देखील जप्त केला त्याचा क्रमांक मला सांगता येणार नाही. आता मला आर्टीकल अ वरील लोखंडी रॉड दाखवला. माझ्यासमक्ष पोलीसांनी जप्त केलेला रॉड तोच आहे. मला जप्त ट्रॅक्टर दाखवल्यास मी ओळखू शकतो. आर्टीकल अ वर लावलेल्या चीट्ठीवर माझी पंच म्हणून सही आहे. पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा केला आता मला सदरचा जप्ती पंचनामा दाखवला. तो तोच असून त्यावर पंच क्र.२ म्हणून ची सही माझी आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी क्र.५८** देण्यात आले.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी.बी.औताडे यांचेमार्फत सुरु–</u>**

**२.** मी दि.२८.०७.२०२० रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वाजाच्या दरम्यान पोलीस स्टेशनला गेलो. मी पोलीस स्टेशनला एकच सही केली व निघून गेलो.

मी पोलीस स्टेशरवरुन घरी किती वाजता गेलो हे मला सांगता येणार नाही. मला ट्रॅक्टरचा क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणत्याही वस्तू जप्त केल्या नाहीत. फिर्यादी सुशिलाबाई ही माझी भावजयी आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व माझी जमिन एका गटात आहे. मला आरोपी व फिर्यादी यांच्यात जमिनीचे वादाबाबत न्यायालयात दावे चालू आहेत याची माहिती आहे. मला याची माहिती नाही की, न्यायालयाने वादादीत जमिनीत फिर्यादीने जावू नये याबाबत मनाई हुकूम दिला आहे किंवा कसे. हे मला माहित नाही की, आर्टीकल अ वरील गजासारखे गज सहजरित्या कोठेही मिळतात किंवा कसे. मी पोलीस स्टेशनला गेलो तेंव्हा तेथे आर्टीकल अ वरील गज होता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याकरीता माझी भावजयी सुशिलाबाई हिने मला पोलीस स्टेशनला बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/-

**(ए.एस.कांबळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,
न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

दिनांक – ०८/१०/२०२५.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.५५**

**साक्षीदार क्र. ६ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – संदीप सुदाम आसणे,

**वय** – ४० वर्षे, व्यवसाय –शेती,

**राहणार** – माळवडगांव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु**

१. माझ्या कुटुंबात मी, माझी पत्नी, दोन मुले व आई असे राहतो. तसेच माझा भाऊ दिलीप सुदाम आसणे, त्याची पत्नी सुशिला, मुलगा विकास व मुलगी जयश्री आसणे असे एका ठिकाणी राहतो. आमची वस्ती गट नं.१०२/४ मौजे माळवडगाव मध्ये आहे. आरोपी हे माझ्या शेजारी राहतात. आरोपी व आमच्यामध्ये २० गुंठे जमिनीचा वाद आहे. घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजाच्या सुमारास आमच्या घरासमोर शेतामध्ये घडली होती. सदर रोजी सागर भाऊसाहेब आसणे व दादासाहेब पदमनाथ आसणे यांनी आम्ही खरेदी केलेल्या शेतात ट्रॅक्टर आणला. त्यावेळी माझी भावजयी सुशिला दिलीप आसणे यांनी त्यांना आम्ही सदर शेत जमिन घेतलेली आहे, त्यात घास पीक उभे आहे, त्यात रोटर मारु नका असे सांगितले. तेंव्हा सागर व दादासाहेब यांनी शिवीगाळ सुरु केली व माझा पुतण्या विकास यास गजाने मारहाण केली. सदर ठिकाणी मी, माझी पत्नी देखील होतो. आरोपी सागर भाऊसाहेब आसणे, दादासाहेब पदमनाथ आसणे, बाबासाहेब सोपान सुरासे, शोभा दादासाहेब आसणे, वनीता दादासाहेब आसणे, जिजाबाई सोपान आसणे हे ६ जण सदर ठिकाणी होते. सदर गजाने मारहाण केल्याने विकासला डोक्याला मार लागला. आरोपींनी विकासचा मोबाईल फोडला होता. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो व तेथून पोलीसांचा मेमो घेवून साखर कामगार हॉस्पीटल येथे विकास यास दाखल केले. त्यानुषंगाने विकास याने आरोपींविरुद्ध फिर्याद दाखल केली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला. आरोपींनी सदर रोजी घटनेत वापरलेला गज मी

पाहिल्यास ओळखू शकतो. आर्टीकल अ वरील गज तोच आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी क्र.१ दादासाहेब व आरोपी क्र.४ शोभा दादासाहेब आसणे हे न्यायालयात हजर आहेत इतर आरोपी न्यायालयात हजर नाहीत.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए.एस.शेळके यांचेमार्फत सुरु–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, जूलै २०२० मध्ये कोरोना या संसर्गजन्य विषाणुमूळे लॉकडाऊन होते व बाहेर फिरण्यास बंदी होती. मला याची माहिती नाही की, आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये दिवाणी दावे चालू आहेत किंवा कसे. वादादीत शेतजमिनीचा गट क्रमांक मला माहित आहे, तो गट नं.१०२/५ असा आहे. मी गट नं.१०२/५ चा ७/१२ उतारा पाहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या नावे सदर गटामध्ये आजदेखील १० गुंठे जमिन असल्याचे दाखवते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझ्या पत्नीने त्याबाबत आरोपीविरुद्ध दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची सदर १० गुंठे जमिनीची देखील मागणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी १०२/५ मध्ये येवूचनये अशी देखील आमची मागणी आहे. हे मला सांगता येणार नाही की, आरोपींनी सदर शेत जमिनीत येवू नये म्हणून आमचे विरुद्ध मनाई हुकूम घेतला किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०२/५ मधील शेतजमीनीमध्ये आरोपींची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०२/५ चे पोट हिस्से झाले नाहीत.

३. मी पोलीस स्टेशनला १८.०७.२०२० रोजी फिर्यादीसोबत गेलो होतो. सदर ठिकाणी आम्ही पोलीसांना घटना जि झाली ती सांगितली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. तो प्रश्नोत्तर स्वरुपात घेतला होता. मी पोलीसांना जबाब देतेवेळी दादासाहेब पदमनाथ आसणे यांनी ट्रॅक्टर आणला होता असे पोलीसांना सांगितले होते. आता मला पोलीसांसमोरील माझा जबाब दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर माझ्या जबाबात नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी सुशिला आसणे यांनी सदर क्षेत्र हे आम्ही खरेदी केले असे म्हटल्याचे सांगितले होते. सदर मजकूर माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.१०२/५ मध्ये न्यायालयाचा तुर्तातुर्त हुकूम आमच्या विरोधात असतांना देखील आम्ही सदर

गटामध्ये जावून प्रतिवादींना त्रास देतो व हरकत अडथळे निर्माण करतो. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०२/५ मधील आरोपींच्या क्षेत्राच्या पूर्वेस नवनाथ आसणे यांचे क्षेत्र आहे व पश्चिमेस गट नं.१०२/४ आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ आरोपींना त्रास देण्याकरीता आमच्या कुटुंबीयांनी खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/-

**(ए.एस.कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,

न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

दिनांक – १०/०९/२०२५.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.५४**

**साक्षीदार क्र. ५ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – जयश्री दिलीप आसणे,

**वय** – २१ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,

सध्या राहणार राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु**

१. माझ्या कुटुंबात घटनेच्या वेळी मी, माझा भाऊ, आई–वडील असे राहत होतो. आमची वस्ती हि आमच्या शेतजमीनत गट नं.१०२/५ मध्ये आहे. आमच्या शेजारी आरोपी हे राहतात. आरोपी व माझ्या वडीलांमध्ये २० आर इतक्या क्षेत्राच्या जमीनीचा वाद होता. घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजाच्या सुमारास आमच्या शेजारी शेतामध्ये घडली होती. सदर वेळी मी घटनास्थळी होते. सदर वेळी जिजाबाई सोपान सुरासे, बाबासाहेब सोपान सुरासे, वनीता दादासाहेब आसणे, सागर भाऊसाहेब आसणे, शोभा दादासाहेब आसणे यांनी मला, माझ्या भावास व आईस मारहाण केली. सदर वेळी आरोपी हे ट्रॅक्टर घेवून आमच्या शेतात आले. त्यांनी नांगरण्यास सुरवात केली. माझ्या आईने शेतात ट्रॅक्टर घालू नका असे म्हणाली. त्यांनी उलट आम्हाला मारहाण करण्यास सुरवात केली. आरोपींनी माझ्या भावास लोखंडी रॉडने मारले तसेच मला व माझ्या आईला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. तेथून दवाखान्यात गेलो. माझा भाऊ विकास यास डोक्याला मार लागला होता. त्यामुळे त्याला सदर ठिकाणी ॲडमीट करण्यात आले. त्यानंतर माझ्या भावाने फिर्याद दाखल केली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला. आरोपींनी ज्या गजाने माझ्या भावास मारहाण केली ती आजरोजी पाहिल्यास मी ओळखू शकते. आर्टीकल अ वरील गज तोच आहे. मी आरोपीस पाहिल्यास ओळखू शकते. आजरोजी आरोपी क्र.१ दादासाहेब व आरोपी क्र.४ शोभा दादासाहेब आसणे हे न्यायालयात हजर आहेत इतर आरोपी न्यायालयात हजर

नाहीत.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी.बी.औताडे यांचेमार्फत सुरु–</u>**

२. मी माझे आई व भावासह पोलीस स्टेशनला दि.१८.०७.२०२० रोजी गेले होते. पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे विचारपूस केली होती. मी पोलीसांना घटना सांगितली होती. पोलीसांनी मी जसे सांगितले तशी घटना लिहीली होती. त्यानंतर माझी व पोलीसांची परत भेट झाली नाही. सुशिलाबाई हया माझ्या आई आहेत. मी जि खरेदीची जमिन म्हणते त्या जमिनीत घटना घडली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दाव्याचे कामी सदर वादादीत जमिनीचे आरोपीचे कब्जेवहिवाटीस आम्ही हरकत अडथळा करु नये असा न्यायालयीन तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कुटुंबातील लोकांनी १० गुंठे जमिनीचे खरेदीखत होवून मिळावे याकरीता आरोपीविरुद्ध दिवाणी दावा केलेला आहे व तो प्रलंबीत आहे. घटनास्थळाच्या आजूबाजूला लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ठिकाणी आरोपीची ३० गुंठे इतकी जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीमध्ये त्यांची वस्ती आहे व तेथे ते राहतात. हे म्हणणे खरे आहे की, वस्तीचे खरेदीखत केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ वरील गज हा माझ्या भावाने पोलीसांना दिला. घटनेच्या वेळी आजूबाजूचे लोक आले नव्हते.

३. घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजाच्या सुमारास आमच्या शेजारच्या शेतात घडल्याचे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. आता मला माझा पोलीसांसमोरील जबाब दाखवला. सदरचा मजकूर माझ्या जबाबात का नमूद नाही तो का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी आरेपींनी जमीन नांगरायला सुरवात केली असे सांगितले होते, पोलीसांनी सदरचा मजकूर माझ्या जबाबात का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझ्या आईने आरोपींना शेतात ट्रॅक्टर घालु नका असे सांगितले होते. पोलीसांनी सदरचा मजकूर माझ्या जबाबात का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला माझ्या आईस भावाला मारहाण केली मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी लोखंडी रॉडने माझ्या भावास, मला व माझ्या आईस लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/-

**(ए.एस.कांबळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,

दिनांक – १०/०९/२०२५. न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.५२**

**साक्षीदार क्र. ४ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – कविता संदिप आसणे,

**वय** – ३२ वर्षे, व्यवसाय – घरकाम,

**राहणार** – माळवडगांव, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एम.एफ.पर्बत यांचे मार्फत सुरु**

**१.** फिर्यादी विकास हा माझा पुतण्या आहे. आरोपी हे माझे चुलत दिर असल्याने व आमच्या समोरच राहण्यास असल्याने मी त्यांना ओळखते. आरोपी दादासाहेब यांची गट नं.१०२/५ मधील २० गुंठा जमीन माझी जाऊ सुशीला आसणे यांनी घेतली होती व १० गुंठे जमीनीचा माझ्या नावाचा कागद तयार करण्यात आला आहे. त्यावरुन आमचे वाद होते. घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजाच्या सुमारास मौजे माळवडगाव येथे शेतामध्ये गट नं.१०२/५ मध्ये घडली होती. त्यावेळी सागर भाऊसाहेब आसणे हा सोनालिका ट्रॅक्टर घेवून आमच्या सदर घेतलेल्या शेतजमिनीत आला त्याने उभ्या घासाच्या पीकात ट्रॅक्टर घातला व रोटर मारले. त्यावेळी माझी जाऊ सुशिला आसणे व त्यांची मुले विकास व जयश्री हे आडवे गेले व आमच्या शेतात ट्रॅक्टर घालू नका असे म्हणाले. त्यावेळी सदर ठिकाणी मी, माझे पती व सासूबाई गेलो. त्यावेळी आरोपी दादासाहेब आसणे, सागर आसणे, बाबासाहेब सुरासे, वनिता आसणे, शोभा आसणे, जिजाबाई सुरासे आले व सागर आसणे याने ट्रॅक्टरमधून लोखंडी रॉड काढला व विकास याच्या डोक्यात मारला. बाबासाहेब यांनी विटकर फेकून विकास यास मारले. सागर आसणे याने विकास आसणे याचा मोबाईल फोडला. इतर लोकांनी जयश्री हिस खाली पाडून लाथाबुक्कयांनी मारहाण केली. माझे पती व मी सोडवायला गेलो असता, त्यांनी माझ्या पतीला व मला हाणमार केली. त्यानंतर आम्ही विकास यास साखर कामगार हॉस्पीटल येथे उपचाराकामी दाखल केले. त्याला दवाखान्यात दाखल केल्यानंतर

घटनास्थळी पोलीस आले. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली व जबाब नोदंवला. ज्या लोखंडी रॉडने विकासला मारले होते तो लोखंडी रॉड मी आजरोजी पाहिल्यास ओळखू शकते. आर्टीकल अ वरील लोखंडी रॉड मला दाखवला, तो तोच आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आजरोजी आरोपी वनीता हिस सोडून इतर सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण .**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. एस. शेळके यांचेमार्फत सुरु–**

२. मी गट नं.१०२/५ चा ७/१२ उतारा पाहिला नाही. हे मला सांगता येणार नाही की, गट नं.१०२/५ मध्ये सुशिला आसणे यांनी घेतलेल्या जमिनीव्यतिरीक्त आरोपींची जमीन आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनीत गट नं.१०२/५ मध्ये आरोपींची १० गुंठे जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांची व माझी दवाखान्यात भेट झाली. पोलीसांनी माझ्याकडे दवाखान्यात विचारपूस केली होती. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला.

३. मी पोलीसांना जबाब देतेवेळी गट नं.१०२/५ मध्ये माझा देखील १० गुंठ्याचा कागद झाला, सुशिला, विकास व जयश्री हे ट्रॅक्टरला आडवे गेल्याचे, आम्ही तेथे गेल्याचे, आम्ही सोडवायला गेल्याचे व आरोपींनी मला व माझे पतीस मारहाण केल्याचे पोलीसांना सांगितले होते. आता मला माझा पोलीसांनी नोंदवलेला जबाब दाखवला. सदरचा मजकूर पोलीसांसमोरील माझ्या जबाबात नमूद नाही. तो का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, सुशिला आसणे यांना २० गुंठे जमिन व मला १० गुंठे जमीन मला आरोपीची गिळणकृत करायची असल्याने खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला, माझी जाऊ सुशिला, पुतण्या विकास व जयश्री यांना मारहाण केल्याचे तसेच माझ्या पतीस मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सागर आसणे याने विकास यास लोखंडी रॉडने मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दादासाहेब, शोभा व वनीता हे कामाच्या निमीत्ताने सिन्नर

येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/-

**(ए.एस.कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,

दिनांक – ०४/०८/२०२५.

न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.५१**

**साक्षीदार क्र. ३ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – सुशिला दिलीप आसणे,

**वय** – ३६ वर्षे, व्यवसाय – शेती,

**राहणार** – माळवडगांव, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एम.एफ.पर्बत यांचे मार्फत सुरु**

**१.** फिर्यादी विकास हा माझा मुलगा आहे. आरोपी हे माझे चुलत दिर व भाऊबंद असल्याने मी त्यांना ओळखते. घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजाच्या सुमारास मौजे माळवडगाव येथे शेतामध्ये घडली होती. मी दादासाहेब आसणे यांची गट नं.१०२/५ या शेतजमिनीपैकी २० गुंठे जमिन विकत घेतली होती. आरोपी हे सदर जमिन परत मागत असून त्याकरीता भांडण करतात. घटनेच्या दिवशी आरोपी सागर भाऊसाहेब आसणे हा त्यांचे सोनालिका ट्रॅक्टर घेवून गट नं.१०२/५ या शेतजमिनीत आला व त्याने रोटर मारुन घासाचे व मक्काचे पीकांचे नुकसान केले. मी त्यांना पुढे जावून पीकांचे नुकसान करु नका, पीके मोडू नका असे सांगू लागले. त्यावेळी माझ्यासोबत माझा मुलगा विकास दिलीप आसणे व मुलगी जयश्री हे देखील होते. त्यावेळी तेथे दादासाहेब पदमनाथ आसणे, शोभा दादासाहेब आसणे, सागर भाऊसाहेब आसणे, वनिता दादासाहेब आसणे, जिजाबाई सोपन सुरसे, बाबासाहेब सोपान सुरसे हे तेथे आले. त्यांनी सदर शेत त्यांचे आहे या शेतात यायचे नाही असे म्हणून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. शेताचे बाहेर व्हा, असे म्हटले. त्यानंतर त्यांनी मारहाण करण्यास सुरवात केली. बाबासाहेब यांनी विटाने विकास यास मारले. शोभा दादासाहेब आसणे हिने जयश्री व विकास यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. जिजाबाई हिने लाथाबुक्क्याने जयश्री हिस मारले. वनिता हिने मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सागर भाऊसाहेब आसणे याने ट्रॅक्टरमधून लोखंडी रॉड काढला व विकासच्या डोक्यात मारला. त्यामुळे त्याच्या डोक्याला मार

लागला. सर्व आरोपींनी आम्हाला मारहाण केली. विकास हा डोक्याला मार लागल्याने खाली पडला. माझे दिर संदीप सुदाम आसणे याने विकास यास साखर कामगार हॉस्पीटल येथे घेवून गेले. सदर ठिकाणी विकास हॉस्पीटलमध्ये असतांना पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला. सागर भाउसाहेब आसणे याने विकास याचा मोबाईल फोडला होता. पोलीसांनी त्यानुषंगाने माझा जबाब नोंदवला. ज्या लोखंडी रॉडने विकासला मारले होते तो लोखंडी रॉड मी आजरोजी पाहिल्यास ओळखू शकते. आर्टीकल अ वरील लोखंडी रॉड मला दाखवला तो तोच आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आजरोजी आरोपी वनीता हिस सोडून इतर सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. एस. शेळके यांचेमार्फत सुरु–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांची व माझी भेट घटणेच्या दिवशी झाली. हे म्हणणे खरे आहे की, त्याच दिवशी पोलीसांनी माझ्याकडे येवून विचारपूस केली व जबाब नोंदवला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने व मुलाने पोलीसांना आर्टीकल अ वरील लोखंडी रॉड दिला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दादासाहेब यांचे एकत्र कुटुंब आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०२/५ मध्ये आरोपींची देखील १० गुंठे जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जे २० गुंठे जमीन विकत घेतली आहे असे म्हणत आहे त्याबाबतचे दावे न्यायालयात प्रलंबित आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०२/५ मधील १० गुंठे जमीन मी खरेदी घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०२/५ मधील जमिनीचे मेहनत मशागतीकरीता हरकत अडथळे करु नये अशी तुर्तातुर्त न्यायालयाने आमचे विरुद्ध दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सदर आदेशाचे उल्लघंण केले म्हणून देखील आरोपीने आमचेविरुद्ध न्यायालयात गुन्हे दाखल केले आहे.

३. आरोपींनी मारहाण केलेबाबत आम्ही सर्वांनी दवाखान्यात उपचार घेतला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी माझ्या गट नं.१०२/५ मध्ये येवू नये अशी माझी इच्छा आहे.

४. मी पोलीसांना माझा जबाब देतेवेळी आरोपींनी माझ्या मक्याच्या पीकाचे

नुकसान केल्याचे, सागर आसणे याने धमकी दिली व मारहाण केली, माझा मुलगा विकास खाली पडला हा मजकूर पोलीसांना सांगितला होता. आता मला माझा पोलीसांसमोरील जबाब वाचून दाखवला. सदरचा मजकूर माझ्या जबाबात नमूद नाही तो का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

**५.** आम्ही दरवर्षी आमच्या मालकीचे २० गुंठ्याचे पीकपाण्याची नोंद उता–यास प्रत्येकवर्षी लावतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दादासाहेब यांनी आमच्या विरुद्ध दाखल केलेली प्रकरणे मागे घ्यावी म्हणून हल्लीची खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही संजय पुंडलिक आसणे यांचेविरुद्ध देखील फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आमच्या भावकीतील लोकांना वेगवेगळया तक्रारी दाखल करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/–

**(ए.एस.कांबळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,
न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

दिनांक – ०४/०८/२०२५.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.४९**

**साक्षीदार क्र. २ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – दिलीप सुदामआसणे,

**वय** – ५२वर्षे, व्यवसाय – शेती व नोकरी,

**राहणार** – माळवडगांव, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु**

**१.** माझ्या कुटुंबात माझी पत्नी सुशिला, मुलगा विकास, भाऊ संदीप सुदाम आसणे, मुलगी जयश्री आसणे, आई विमल सुदाम आसणे भावाची पत्नी कविता संदीप आसणे असे हडकवस्ती माळवडगांव येथे राहतो. आमचे शेजारी दादासाहेब पदमनाथ आसणे हे राहतात. घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.३० वाजाच्या दरम्यान घडली. सदर वेळी दादासाहेब आसणे व सागर आसणे यांनी माझ्या पत्नी सुशिला हिचे नावावर असलेल्या शेतजमिनीत ट्रॅक्टर आणला. सदर शेतजमिनीमधील घास रोटरने मोडून टाकला. माझ्या मुलाला मारहाण केली. माझ्या मुलाला सागर भाऊसाहेब आसणे याने गजाने मारले. शोभा दादासाहेब आसणे हिने माझ्या पत्नीस मारहाण केली. माझ्या मुलीस दादासाहेब आसणे, सागर भाऊसाहेब आसणे, संगिता सोपान सुरासे यांनी मारहाण केली. बाबासाहेब सोपान सुरासे यांनी पण माझ्या पत्नीला व मुलीला मारहाण केली. बाबासाहेब सुरासे यांनी विटकरीने माझ्या मुलीला मारहाण केली. त्यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. माझा भाऊ संदीप सुदाम आसणे याने सोडवासोडव केली परंतु, आरोपींनी त्यालादेखील मारहाण केली. आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी माझा मुलगा, मुलगी व पत्नीच्या उपचाराकामी पत्र दिले. आम्ही साखर कामगार हॉस्पीटल येथे गेलो. त्यानंतर पोलीसांना माझ्या मुलाने फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला. माझ्या मुलास ज्या गजाने मारहाण केली होती, तो पाहिल्यास मी ओळखू शकतो. आर्टीकल अ वरील गज तोच आहे. मी आरोपींना

पाहिल्यास ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात हजर नाहीत. (आरोपीतर्फे गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी क्र.४६ प्रमाणे देण्यात आला.)

**सरतपास पुर्ण .**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी.बी. औताडे यांचेमार्फत सुरु–**

२. मी संजय पुंडलिक आसणे व अनिता संजय आसणे यांच्याविरुद्ध देखील मारहाणीची फिर्याद दाखल केली आहे. त्यांचा आमच्या बांधाला बांध आहे. आमचे बांधावरुन भांडण नव्हते. संजय आसणे व माझे जमिनीचे वाद नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला असे वाटते की, संजय आसणे यास आरोपी भांडणासाठी प्रवृत्त करतात. हे म्हणणे खरे आहे की, वादादीत जमिनीबाबत न्यायालयात आरोपी व आमच्यात दावा चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाने सदर दाव्याचे कामी आम्हाला तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला आहे. आम्ही त्यांना मेहनत करु देत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्यांनी आमच्याविरुद्ध मानहानी प्रकरण दाखल केले आहे. २० गुंठे जमिनीचे अविभक्त हिश्याचे खरेदी खत ५ लाख रुपयाचा मोबदला दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी खतात ५ लाख रुपये नमूद केले नाही. साक्षीदार सांगतो की, त्यात कमी रक्कम नमूद केली. हे म्हणणे खरे आहे की, १० गुंठे जमिनीचा देखील आरोपी व आमच्यात वाद चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, दादासाहेब याची सदर ठिकाणी ३० गुंठे जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीत त्यांची वस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ३० गुठयांवरती हक्क सांगत आहोत. हे मला माहित नाही की, खरेदीखतात वस्तीचा उल्लेख केला आहे किंवा नाही.

३. असे झाले नाही की, घटना हि मला विकासने फोनवर सांगितली. विकास एक जणाला घेवून कारखान्यावर माझ्या कामाच्या ठिकाणी आला होता.मी पोलीसांना असे सांगितले नव्हते की, विकासने घटनेची, सरतपासातील माहिती मला फोनद्वारे सांगितली होती. आता मला माझ्या जबाबातील परिच्छेद अ मधील मजकूर वाचून दाखवला. पोलीसांनी सदरचा मजकूर का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील आरोपींनी माझ्या मुलांना, पत्नीस व भावाला मारल्याचा मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला गज

मागितला व मी गज दिला. पोलीसांनी गज भांडणाच्या ठिकाणाहून आणला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/-

**(ए.एस.कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,

दिनांक – ०९/०७/२०२५.

न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**
**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**
**निशाणी क्र.४७**

**साक्षीदार क्र. १ चा शपथेवर जबाब.**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – विकास दिलीप आसणे,

**वय** – २४ वर्षे, व्यवसाय – मजूरी,

**राहणार** – माळवडगांव, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु**

**१.** घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.३० वाजाच्या दरम्यान गट नं.१०२/५ मौजे माळवडगाव येथे घडली. सदर शेतजमिन ही माझी आई सुशिला दिलीप आसणे यांचे नावे आहे. सदर जमिनीमध्ये आमचे घासाचे पीक होते. माझी आई दादासाहेब आसणे, सागर भाऊसाहेब आसणे, जिजाबाई सोपान सुरासे, वनीता दादासाहेब आसणे, शोभा दादासाहेब आसणे, बाबासाहेब सोपान सुरासे, सागर भाऊसाहेब आसणे यांना सदर शेतजमिनीत रोटर मारु नका असे सांगायला गेली असता, सागर भाऊसाहेब आसणे, दादासाहेब पदमनाथ आसणे, शोभा आसणे, वनिता दादासाहेब आसणे, जिजाबाई सोपान सुरासे, बाबासाहेब सुरासे यांनी आम्हाला मारहाण केली. सागर भाऊसाहेब आसणे याने माझ्या डोक्यात रॉडने मारहाण केली. माझ्या बहिणीस व आईस पोटात लाथाबुक्क्याने मारहाण केली. सागर भाऊसाहेब आसणे हे माझ्या आईस ट्रॅक्टरखाली घेवून जिवे मारुन टाकू असे म्हणाला. माझ्या बहिणीच्या पोटात सागर भाउसाहेब आसणे, बाबासाहेब सोपान सुरासे, दादासाहेब पदमनाथ आसणे व जिजाबाई सोपान सुरासे यांनी माझ्या बहिणीला धरुन पोटात लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली. बाबासाहेब सुरासे यांनी माझ्या उजव्या हाताला विटकरीने मारहाण केली. माझे चुलते संदीप सुदाम आसणे हे सोडवायला आले असता, त्यांना देखील आरोपींनी मारहाण केली. आरोपींनी माझे वडिल घरी नसताना माझ्यावर हल्ला केला. माझा मोबाईल फोडून टाकला. गजाने मारल्यामूळे माझ्या डोक्यात मार लागला. त्यामूळे शेजा–याने मला साखर कामगार हॉस्पीटल येथे दाखल केले. मी

पोलीसांना जबाब दिला होता. आता मला सदरचा जबाब दाखवला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे. सदरचा जबाब हा दि.२०.०७.२०२० रोजी नोंदवला होता. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४८** देण्यात आले. ज्या लोखंडी रॉडने मला मारहाण केली होती. तो पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला जि.एम.आर क्र.५६/२०२० वरील लोखंडी रॉड दाखवला. तो तोच असून त्यास **आर्टीकल अ** देण्यात आले. ज्या आरोपींनी मला मारहाण केली त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात हजर नाहीत.(आरोपीतर्फे गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी क्र.४६ अन्वये देण्यात आला)

**सरतपास पुर्ण .**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.बी. बी. औताडे यांचेमार्फत सुरु–**

२. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या २० गुंठे अविभक्त हिश्याची खरेदी केली त्याबाबत न्यायालयात दावे चालू आहेत. त्याच शेतात रोटरचे काम चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर २० गुठ्यांव्यतिरीक्त आम्ही अजून १० गुंठे जमिन आरोपीकडे मागणी करत आहोत. हे म्हणणे खरे आहे की, सदर १० गुंठे जमिनीची अद्याप खरेदी झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर २० गुंठे जमिनीकरीता खरेदी खत रद्द करुन मिळावे, सदर खरेदी खत बंधनकारक नाही व निरंतर ताकीदीकरीता दावा दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याचे कामी न्यायालयाने आमच्या विरोधात सदर वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातुर्त ताकीद दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आजही सदर जमिन माझ्या मालकीची व ताब्यात आहे असे म्हणतो. हे म्हणणे खरे आहे की, तुर्तातुर्त ताकीदीच्या आदेशाचे उल्लघंन केले म्हणून आरोपींनी आमच्या विरोधात मारहाणी याचीका दाखल केली आहे.

३. हे मी पाहिले नाही की, साखर कामगार हॉस्पीटलचे गेटमध्ये एक पोलीस कायमचे थांबलेले असतात किंवा कसे. मी दवाखान्यात गेल्यानंतर डॉक्टरांशी बोललो होतो. मला लागले एवढेच बोललो होतो. मी दि.१८.०७.२०२० ते २०.०७.२०२० च्या दरम्यान सदर घटनेची तक्रार पोलीसांना दिली होती. सदरची तक्रार मी लेखी दिली नाही. मी सदरची तक्रार १८.०७.२०२० रोजीच दिली होती.

४. मला सागर याने समोरुन गज मारला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या शेतामध्ये माझ्या पाठीमागे किती लोक उभे होते हे मला दिसले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादादीत १० गुंठे व २० गुंठे जमिनीमध्येच आरोपीची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वस्तीचे खरेदी खत झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०२ चे पोट हिस्से झाले नाहित त्याचा अखंड एकच नकाशा आहे. मी म्हणतो ती २० गुंठेची खरेदी रक्कम रुपये ५ लाखाला केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची अशी तक्रार आहे की, सदर रक्कम त्यांना आम्ही दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामध्ये ५ लाखाची रक्कम नमूद केली नाही.

५. आरोपीची व आमची वस्ती जवळ–जवळ आहे. आमच्या आजूबाजूला दोघांचेही भाऊबंद राहतात. पोलीसांना मी कपडे दिले होते. साक्षीदार सांगतो की, माझा शर्ट पोलीसांनी जबाब घेतेवेळी घेवून गेले होते. मी ज्या वेळेस फिर्याद दिली त्यावेळी माझे चुलते संतोष सुदाम आसणे, माझे वडील दिलीप सुदाम आसणे व माझी आई सुशिला दिलीप आसणे हे होते. माझी बहिण जयश्री देखील नंतर पोलीस स्टेशनला आली होती. मी पोलीस स्टेशनला असतांना नवनाथ चंद्रभान आसणे हा देखील नंतर आला होता. सदर लोकांनी माझ्यासमक्ष पोलीसांना घटनेबाबत जबाब दिले नाहीत. पोलीसांनी माझा शर्ट जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ वरील गज आमच्या बांधकामावरचा आहे व तो मी पोलीस स्टेशनला नेवून दिला.

६. हे म्हणणे खरे आहे की, जमिनीवरुन आम्ही आरोपींविरुद्ध तक्रारी केल्या व आरोपींनी देखील आमच्या विरुद्ध तक्रारी केल्या. माझ्या उजव्या हाताला विटकर लागली होती. हे म्हणणे खरे नाही की, जमिनीच्या वादातून केवळ दहशत निर्माण व्हावी म्हणून आरोपीविरुद्ध हल्लीची खोटी फिर्याद दाखल केली.

७. मी पोलीसांना जबाब देतेवेळी बाबासाहेब सुरासे याने माझ्या 'उजव्या' हाताला विटकरीने मारल्याचे सांगितले नव्हते. मी पोलीसांना जबाब देतेवेळी आरोपींनी माझ्या बहिणीच्या 'पोटात' लाथा मारल्याचे सांगितले होते. आता मला माझा पोलीसांसमोरील जबाब दाखवला. सदर जबाबामध्ये 'पोटात' लाथा मारल्याचे नमूद नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझ्या 'आईला' ट्रॅक्टर घालून मारण्याची धमकी दिल्याचे

सांगितले होते. आता मला माझा पोलसांसमोरील जबाब दाखवला. त्यामध्ये 'आईला' धमकी दिल्याचा मजकूर नमूद नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या डोक्यात गज मारल्याचे, माझ्या आईला, मला मारहाण केलयाचे, विटकरी मारल्याचे, माझ्या बहिणीस पोटात लाथाबुक्कयाने मारल्याचे माझ्या सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी दादासाहेब आसणे हा त्याचे कुटुंबासह सिन्नर येथे नोकरीस होता. हे म्हणणे खरे आहे की, सुरासे हे आमचे गावचे नाहित. हे म्हणणे खरे आहे की, जिजाबाई हि तिच्या सासरी तांदुळवाडी, ता.कन्नड येथे राहते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना त्रास देण्याकरीता खोटी फिर्याद दाखल केली व माझ्या सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/-

**(ए.एस.कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ,

न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

दिनांक - ०९/०७/२०२५.